आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांक:04.11.2025 वार:मंगळवार

---

- निवडणूक आयोगातर्फे आजपासून मतदार याद्यांबाबत विशेष पुनरीक्षण मोहिमेचा म्हणजे एसआयआरचा दुसरा टप्पा सुरू.
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी नैनीतालमधील नीम करोली बाबांच्या आश्रमातील कैंची धामला भेट देणार.
- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचाराची आज सांगता. ‘मेरा बूथ सबसे मजबूत’ उपक्रमांतर्गत भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहारमधील महिलांशी संवाद साधणार.
- आयसीसी महिला विश्वकरंडक मिळवणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळातर्फे ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक जाहीर.

<u>मतदार पुनरीक्षण</u>

निवडणूक आयोगातर्फे आजपासून मतदार याद्यांबाबतच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेचा म्हणजे एसआयआरचा दुसरा टप्पा सुरू होणार आहे. नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकंदर ५१ कोटी मतदारांची पडताळणी या मोहिमेत केली जाणार आहे. या मतदारांची पडताळणी करून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. यापूर्वी बिहारमध्ये पडताळणी मोहीम आयोजित करण्यात आली होती. त्यात मतदारांच्या पडताळणीनंतर सात कोटी ४२ लाख मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार तसंच लक्षद्वीपमध्ये मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यापैकी तमिळनाडू, केरळ, पुदुच्चेरी आणि पश्चिम बंगालमध्ये २०२६मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. आजपासून ४ डिसेंबरपर्यंत मोजणीचा टप्पा असेल. मतदार याद्यांचा मसुदा आराखडा ९ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल आणि ७ फेब्रुवारी २०२६ला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. कोणताही पात्र मतदार निवडणूक प्रक्रियेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेणं, तसंच बेकायदा स्थलांतरितांसह अपात्र मतदारांची नावं वगळणं हा या मोहिमेचा उद्देश असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

## राष्ट्रपती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी नैनीतालमधील नीम करोली बाबांच्या आश्रमातील कैंची धामला भेट देणार आहेत. राष्ट्रपतींच्या भेटीमुळे भाविकांना आज दुपारी १२ नंतर मंदिरातप्रवेश देण्यात येणार असून तसं आवाहन करण्यात आल्याचे कैंची धाम मंदिर व्यवस्थापनाने म्हटलं आहे.
राष्ट्रपती मुर्मू आज नैनीतालमधील कुमाऊँ विद्यापीठाच्या विसाव्या दीक्षांत समारंभालाही उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या तीन दिवसांच्या उत्तराखंड दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्या काल नैनीतालमध्ये पोहोचल्या. सुरक्षेच्या कारणास्तव संपूर्ण जिल्हा 'ड्रोन नो-फ्लाय झोन' म्हणून घोषित करण्यात आला आहे.

## बिहार निवडणूक

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यातील प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या आज प्रचार सभा होणार आहेत. कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी, राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्याही आज ठिकठिकाणी सभा होणार आहेत.

## मेरा बूथ सबसे मजबूत

‘मेरा बूथ सबसे मजबूत’ या उपक्रमांतर्गत भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहारमधील महिलांशी संवाद साधणार आहेत. या आगामी चर्चेसाठी आपण उत्सुक असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी युतीचा विजय सुनिश्चित करण्यासाठी महिला मोठ्या समर्पित भावनेनं योगदान देत आहेत, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमांवरच्या पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

## पंतप्रधान

“भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक राहिला नाही, तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनला आहे”, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५चं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. देशात नवोन्मेषाची परिसंस्था निर्माण व्हावी यासाठी सरकार प्रयत्न करत असून जगातली सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारतात असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं.
या कार्यक्रमात त्यांनी देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजनेचाही प्रारंभ केला. खासगी क्षेत्राकडून संचलित केल्या जाणाऱ्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

## भूपेंद्र यादव

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव येत्या दहा तारखेला ब्राझिलमध्ये होणाऱ्या पर्यावरणविषयक परिषदेसाठी रवाना झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या या या कॉप-थर्टी परिषदेत हवामानबदलांबाबत चर्चा केल्या जातात. दोनशे देशांमधल्या धोरणकर्त्यांबरोबरच शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, उद्योजक आणि नागरिक संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित असतात.

## भारत-बहारीन

भारत आणि बहारीन यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा एकमुखानं निषेध केला असून, दहशतवादाशी लढण्याची कटिबद्धता व्यक्त केली आहे. उभय देशांमध्ये झालेल्या पाचव्या उच्च्यायुक्त स्तरावरील चर्चेनंतर हे संयुक्त निवेदन प्रसिद्ध करण्यात आलं. भारताचे परराष्ट्रमंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि बहारीनचे परराष्ट्रमंत्री डॉक्टर अब्दुल्ला अतिफ बिन रशीद अल्झवानी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. गाझातील तणाव निवळण्यासाठी सध्या सुरू असलेल्या सकारात्मक घडामोडींचं स्वागत करण्यात आलं आणि शांतता कराराची अंमलबजावणी करण्याचं महत्त्व अधोरेखित करण्यात आलं.

## इस्राईल नाझी

इस्राईलमधील याद वाशेम या मुख्य नरसंहारविषयक स्मृती केंद्राला नाझींनी दुसऱ्या महायुद्धात मारलेल्या पन्नास लाख ज्यू नागरिकांची ओळख निश्चित करण्यात यश मिळालं आहे. या महायुद्धात मारल्या गेलेल्या साठ लाख नागरिकांपैकी पन्नास लाख नागरिकांची ओळख पटली आहे. पन्नास लाख नागरिकांची ओळख पटणं हा मोठा टप्पा असला तरी आपलं काम अजून पूर्ण संपलं नसल्याचं याद वाशेमचे अध्यक्ष डॅनी डायन यांनी सांगितलं. मारल्या गेलेल्या किंवा जीव वाचलेल्या नागरिकांच्या वंशजांकडून पेजेस ऑफ टेस्टिमनी नावाचे अर्ज भरून घेण्यात आले. त्यातून २८ लाखांपेक्षा जास्त नावं या केंद्राला मिळाली. नरसंहारात मारल्या गेलेल्या प्रत्येक जीवाची वैयक्तिक ओळख पुनर्स्थापित करणं या नैतिक उद्देशानं ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

## शपथविधी

हिंसक निदर्शनं आणि विरोधकांचा बहिष्कार या पार्श्वभूमीवर झालेल्या निवडणुकीनंतर टांझानियाच्या अध्यक्ष सामिया सुलुहू हसन यांनी राजधानी डोडोमा इथल्या लष्करी परेड मैदानावर काल कडक सुरक्षेत दुसऱ्यांदा शपथ घेतली. मतदान मुक्त आणि लोकशाहीवादी झाल्याचं सामिया यांनी भाषणात सांगितलं. त्यांनी निदर्शकांना देशद्रोही म्हटलं. सामिया यांना ९८ टक्के मतांसह विजयी घोषित करण्यात आलं आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी निवडणुकीच्या पारदर्शकतेबद्दल आणि हिंसाचाराच्या वृत्तांवर चिंता व्यक्त केली आहे.

## फिडे बुद्धिबळ

फिडे बुद्धिबळ विश्वकरंडक २०२५ स्पर्धेत भारताचे ग्रँडमास्टर नारायणन एसएल, दीप्तायन घोष यांच्यासह आरण्यक घोष यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. पणजीमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेतून विश्वनाथन आनंद करंडकासाठी पन्नास खेळाडूंची निवड होणार आहे. यापूर्वी सहा भारतीय खेळाडूंनी दुसऱ्या फेरीत स्थान मिळवलं आहे. ८२ देशांमधल्या २०६ खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.

## हॉकी

हॉकीचं शताब्दी वर्ष साजरं करण्यासाठी येत्या ७ नोव्हेंबर रोजी देशभरातल्या साडेपाचशेहून अधिक जिल्ह्यांमध्ये १ हजार ४००हून अधिक हॉकी स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत, अशी माहिती केंद्रीय क्रीडामंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांशी बोलत होते. या उपक्रमाचा उद्देश खेळाबद्दल व्यापक जागरुकता निर्माण करणं, तरुणांना हा खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहित करणं तसंच देशाची क्रीडा संस्कृती बळकट करणं हा आहे. यामुळे तरुणांना हॉकीचा इतिहास जाणून घेऊन त्यांचं भविष्य घडवण्यासाठी प्रेरणा मिळेल, असं मांडवीय म्हणाले.

## पारितोषिक

आयसीसी विश्वकरंडक महिला क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला हरवून करंडकाला गवसणी घालणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे. या विश्वविजेत्या संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक जाहीर केलं आहे.

भारतीय महिला संघातल्या खेळाडूंच्या प्रतिभेला आणि कामगिरीला साजेसा हा विजय आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महिला संघानं संपूर्ण स्पर्धेत आपली सांघिक कामगिरी आणि दृढनिश्चय दाखवत हा ऐतिहासिक विजय मिळवल्याची भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. महिला संघानं आपल्या क्रिकेट कौशल्यानं लाखो मुलींना प्रेरणा दिल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही या संघाचं अभिनंदन केलं आहे.